* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :– १०.०४.२०१९

## लोकसभा निवडणुक प्रक्रीया २०१९ करीता वाशिम पोलीस दल सज्ज, समाजकंटक गुन्हेगाराच्या हालचालीवर प्रतिबंध

मा.पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ चा आढावा घेवुन लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ चे प्रक्रीयामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता लोकसभा निवडणुक २०१९ चे अनुशगांने वाशिम जिल्हयात वाशिम–मंगरूळपीर व कारंजा मानोरा अशा दोन मतदार संघात एकुण ७३० बुथ करीता बंदोबस्त लावण्यात आलेला असुन बंदोबस्तकरीता पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, ०४ उपविभागीय पोलीस अधिकारी, १० पोलीस निरीक्षक, ९४ सपोनि/पोउपनि ८१६ पोलीस कर्मचारी ९८ महिला पोलीस कर्मचारी, ५०० परूष होमगार्ड, १०० महिला होमगार्ड, ०१ कंपनी एसआरपीएफ, ०१ कंपनी आरपीएफ असे बंदोबस्त करीता लावण्यात आले आहेत. मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये अधिकृत परवानाधारका कडील नियमाप्रमाणे २८० शस्त्र जप्त केले असुन १८ अवैध्य शस्त्रे (तलवार, गुप्ती) जप्त केले आहे.लोकसभा निवडणुक संदर्भात वाशिम जिल्हयातील ९१ अधिकारी, १३६८ पोलीस कर्मचारी व ४४० होमगार्ड यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच जिल्हयातील सर्व पोलीस पाटलांना सुद्धा प्रशिक्षण देण्यात आले आहे. वाशिम जिल्हयातील व्यापारी संघटना व महिला संघटनाचे पदाधिकारी यांची बैठक घेवुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका चे अनुषगांने ९२९ ग्रामभेटी देवुन जिल्हातील १९४ सवेदनशिल बुथ ला भेटी दिल्या सर्व पो.स्टे. हद्दीत ४२ रूट मार्च घेवुन प्रत्येक पो.स्टे.अंतर्गत मिटींग घेवुन सर्व सामान्य जनतेमध्ये जातीय सलोखा, मतदान जनजागृती व पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याबाबत आवाहन करून आज पावेतो शांतता कमेटीच्या १२१,पुतळा सुरक्षा समितीच्या १४२ मिटींग घेवुन मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नेमण्यात आलेले चेक पोस्टला १९५ वेळा भेटी देवुन चेकींग करण्यात आली. तसेच वेळो वेळी संपुर्ण जिल्हयात ३७ वेळा कोंबीग ऑपरेशन राबविण्यात आले त्या दरम्यान मा.न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या स्टॅंडिंग वारॅंटचे २५ आरोपीतांना व पकड वारॅंटची बजावणी करून ९३१ आरोपीतांना अटक केली आहे. विशेष मोहिमेत नाकाबंदी दरम्यान वाहन चेकींग करतांना ८,७६,०००/–रु बेहिशोबी रक्कम जप्त करण्यात आली.

सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी लोकसभा निवडणुक संदर्भात योग्य मार्गदर्शन करून प्रचलीत कायद्याचे पालन न करणा–यांवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या. तसेच प्रत्येक पोलीस ठाणे हद्दीतील महत्वाचे ठिकाणे बस स्थानक, प्रमुख बाजारपेठ, महत्वाचे मंदीर, दर्गा परीसराची बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी घातपात विरोधी तपासणी केली. तसेच सर्व सामान्य जनतेमध्ये जातीय सलोखा, मतदान जनजागृती होण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे संकल्पनेतुन पथ नाटयाची निर्मीती करण्यात आली असुन सदर पथनाटयाचे १४ ठिकाणी प्रयोग घेण्यात आले असुन सर्व सामान्य जनतेस निर्भीडपणे मतदान करणेबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुक प्रक्रीया चे अनुषगांने अभिलेखावरील एकुण ११३५ गुन्हेगारांवर वेग वेगळया कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली असुन त्यापैकी ५६ कियाशिल गुन्हेगारांवर हद्दपरीची कार्यवाही सुरु करण्यात आली असुन २३१ लोकांवर कलम १४४ सिआरपीसी प्रमाणे तात्पुरते स्थानबध्द करण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत.

तसेच दारुबंदी व जुगार बंदी बाबत संपुर्ण जिल्हयामध्ये विशेष मोहिम राबवुन विशेष मोहिमे अंर्तगत वाशिम जिल्हयातील अवैध दारू विक्री करणाऱ्या इसमांवर विरूध्द ३५९ गुन्हे दाखल करून ८,१६,००३/—रू किंमतीची अवैध दारू जप्त व नष्ट करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये ५० गुन्हे दाखल करून २,५२,२५५/—रू.चा माल हस्तगत करून जप्त करण्यात आला आहे. तसेच लोकसभा निवडणुक आचारसंहितेच्या दरम्यान पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे ०३ व कारंजा शहर येथे ०१ असे ०४ दखलपात्र गुन्हे दाखल झाले असुन त्यागुन्हयात वि. कोर्टात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे व पोलीस स्टेशन धनज, कारंजा शहर, मानोरा अंतर्गत ०५ अदखलपात्र गुन्हे दाखल झाले असुन कलम १५५(२) सिआरपीसी प्रमाणे वि. न्यायालयातुन तपास करण्याची परवानगी घेण्यात आलेली असुन तपास सुरू आहे.

जिल्हा पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांनी लोकसभा निवडणुक २०१९ ची मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सर्व नागरिकांना सतर्क राहण्या बाबत आवाहन करुन प्रत्येकांना आपला मतदानाचा हक्क बजावण्या बाबत आवाहन केले आहे. यादरम्यान आपणास काही आक्षेपार्ह आढळल्यास त्याबाबत आपण नि:संकोचपणे नियंत्रण कक्ष वाशिम येथे माहिती कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम